झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.
जा.क्र.झोपुप्रा./तां.१/ ९३१४/२०२३
दिनांक : १४/०७/२०२३

४८८
१४/०७/२०२३

# झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र-अंतिम योजना

(विशेष नियमावली, २०१४ मधील नियम क्र. एस. आर. ४(५) अन्वये योजनेस प्रशासकीय मान्यता)

प्रस्तावना :

१. मौजे गुलटेकडी,सि.स.नं.५४४ अ/१अ पै., टी.पी.स्कीम नं. III, फा.प्लॉ.क्र. ४३०, प्लॉ.क्र. ४४, मध्ये अस्तित्वात असलेल्या डायस प्लॉट झोपडपट्टी संदर्भात ९४६.३९ चौ.मी. क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी मे. मिनामणी इस्टेट एंटरप्रायझेस यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि. २३/०२/२०१५ रोजी सदर मिळकतीवरील ९८.२७ टक्के झोपडीधारकांच्या संमतीसह प्रस्ताव दाखल करणेत आला आहे.परंतु तद्नंतर विकसक मे. मिनामणी इस्टेट एंटरप्रायझेस यांनी विकसक मे. बुशरा कन्स्ट्रक्शन्स यांना सदर जमीन खरेदीखता द्व्यारे विक्री केल्याने सदर योजना क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी मे. मिनामणी इस्टेट एंटरप्रायझेस ऐवजी विकसक म्हणून मे. बुशरा कन्स्ट्रक्शन्स यांनी नेमणूक करणेबाबत दिनांक ३०/०९/२०२२ रोजी प्राधिकरणामार्फत आदेश पारित करणेत आलेला आहे.त्याच प्रमाणे सदर ठिकाणी परिशिष्ट – २ नुसार पात्र ९२ झोपडीधारकांपैकी ८४ झोपडीधारकांची संमती मे. बुशरा कन्स्ट्रक्शन्स यांनी प्राधिकरणात सादर केली आहे.

२. सदर प्रकरणी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निमूर्लन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ नुसार खालीलप्रमाणे विहित कार्यवाही पार पाडली आहे.

अ) उक्त अधिनियमाचे कलम ३क अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून १०/०२/२०१४ रोजीच्या एकत्रित आदेशाद्वारे घोषित करण्यात आले व महाराष्ट्र शासनाचे राजपत्र दि.२६/०२/२०१४ चे अधिसुचनेद्वारे पृष्ठ क्र. २६ वर प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

आ) उक्त अधिनियमाचे कलम ३ड अन्वये झोपडपट्टी निमूर्लन आदेश जा.क्र.५६४ दि. २६/०४/२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आले आहेत.

इ) सक्षम प्राधिकारी यांनी दि.१८/०१/२०१७ रोजीची झोपडीधारकांची अंतिम पात्रता यादी (परिशिष्ट – २) करण्यात आली आहे.

३. सदर मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याच्या दृष्टीने विकसकामार्फत या कार्यालयात दाखल करण्यात आलेल्या प्रस्तावास अनुसरून झो.पु. प्राधिकरणामार्फत दि.२७/०६/२०२३ रोजी उक्त नियमावलीतील नियम क्र. ४(३) अन्वये "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र प्रारुप योजना" सदर मिळकतीवरील झोपडीधारकांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रारूप योजने संदर्भात प्राप्त दावे/हरकत/सुचना संदर्भातील स्थिती खालीलप्रमाणे आहे.

अ. सदर मिळकतीवरील कोणत्याही झोपडीधारकाची विहीत मुदतीत सदर प्रारुप योजनेसंदर्भात लेखी हरकत/सुचना अथवा तक्रार या प्राधिकरणास प्राप्त झालेली नाही.

४. या प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ४५ अन्वये विकास/बांधकाम परवानगी (Commencement Certificate) देणेसंदर्भात आदेश स्वतंत्रपणे पारित करण्यात येतील. सदरच्या अंतिम योजनेमध्ये प्रसंगानुरूप आवश्यक असल्यास बदल करण्यात येतील.

५. सदर योजनेद्वारे विकसक मे. बुशरा कन्स्ट्रक्शन्स यांना सदर मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकरीता या प्राधिकरणाच्या वतीने प्राधिकृत करण्यात येत असून विकसक यांनी उक्त अधिनियमातील व उक्त नियमावलीतील तरतूदीस अधिन राहून सदर योजनेची अंमलबजावणी करणे अनिवार्य राहील. सदर योजना राबविण्यासाठी अपेक्षित असलेले व्यवस्थापन व होणारा सर्व खर्च करणेची संपूर्ण जबाबदारी विकसकाची आहे.

६. सदर योजनेचे विकसक मे. बुशरा कन्स्ट्रक्शन्स यांनी सदर मिळकतीवर विहित मुदतीत प्रकल्प सुरू करणे, बांधकाम व प्रकल्प पूर्ण करणे बंधनकारक राहील व या संदर्भातील शासनाने तसेच प्राधिकरणाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे अनुपालन करणे विकसक यांच्यावर बंधनकारक राहील.

सदरची अंतिम योजना ही माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह जारी करण्यात आली असून प्रस्तुतचा निर्णय हा सर्व संबंधितांवर बंधनकारक राहील, याची नोंद घ्यावी.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
दिनांक :- १४/०७/२०२३

14.7.2023

नीलेश र. गटणे भा.प्र.से
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत माहितीस्तव :

१. मा. आयुक्त, महानगरपालिका, पुणे.
२. झोपुप्रा पुणे कार्यालयातील विभाग
   - सक्षम प्राधिकारी क्र.१
   -सहा.निबंधक सहकारी संस्था - सदर प्रकरणी सहकारी संस्था नोंदणी प्रक्रिया चालू करावी.
   -संगणक शाखा - सदर आदेशास संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात यावी.
३. जमिनीचे भोगवटादार तथा विकसक - मे. बुशरा कन्स्ट्रक्शन्स, शॉप नं ०३, शहनुर कॉम्प्लेक्स ५१४,भवानी पेठ पुणे ४११०४२
४.मौजे गुलटेकडी,सि.स.नं.५४४ अ/१अ पै., टी.पी.स्कीम नं. III, फा.प्लॉ.क्र. ४३०, प्लॉ.क्र. ४४, (डायस प्लॉट झोपडपट्टी) येथील झोपडपट्टीधारकांकरीता माहितीसाठी संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत आहे.